॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

✲ सुविचार ✲

तुमचे आजचे प्रयत्न तुमच्या भविष्याची दिशा ठरवतात.

अहिल्यानगर ▪ शुक्रवार, दि. ५ जून २०२६ ▪ वर्ष ७ वे ▪ अंक ११ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

# माघारी नाट्यानंतर भाजपाचे प्राजक्त तनपुरे बिनविरोध

## माघारी अर्जावरुन दिवसभर रंगले नाट्य । ना. राधाकृष्ण विखे पाटील, आ. संग्राम जगताप यांच्या मध्यस्थीने पानसरेंची हरकत मागे

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज माघारीवरुन हायव्होल्टेज ड्रमा पहायाला मिळाला. उमेदवारी अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी अपक्ष उमेदवारांनी माघार घेतल्यानंतर प्राजक्त तनपुरे यांचा बिनविरोधचा मार्ग मोकळा झाला. मात्र अपक्ष उमेदवार दत्तात्रय पानसरे यांच्यावतीने सुचक शहाबाज सय्यद यांना दाखल केलेल्या माघारी अर्जावर आपली सही सही नसल्याचा आक्षेप घेत पानसरे यांनी आपला अर्ज कायम ठेवावा अन्यथा आपण आत्मदहन करणार असल्याचा इशारा दिल्याने एकच गोंधळ उडाला. पानसरे यांनी नोंदवलेला आक्षेप रात्री उशिरा मागे घेतल्यानंतर प्राजक्त तनपुरे यांची निवड बिनविरोध झाली.

अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठी श्रीरामपूरचे काँग्रेसचे करण ससाणे, शेवगावचे कमलेश गांधी, अकोलेचे मच्छिंद्र धुमाळ, राज्य पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे यांनी अपक्ष तर प्राजक्त तनपुरे यांनी भाजपाकडून उमेदवारी अर्ज दाखल केले होते. निवडणुकीत महाविकास आघाडीने अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल न केल्याने काँग्रेसचे करण ससाणे मविआचे उमेदवार असतील अशी शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र उमेदवारी अर्ज माघारीच्या दिवसापर्यंत काँग्रेसपक्षाकडून विचारणा न झाल्याने ससाणे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्या अगोदर दुपारी एक वाजता मच्छिंद्र धुमाळ यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यानंतर पावणे दोन वाजता आ. मोनिका राजळे या कमलेश गांधी यांना जिल्हाधिकारी कार्यालयात घेऊन आल्यानंतर गांधी यांनी माघार घेतली. त्यानंतर दत्तात्रय पानसरेंच्यावतीने सुचक शहाबाज सय्यद यांनी माघारीचा अर्ज दाखल केला. मात्र त्यानंतर पानसरे यांनी दाखल केलेल्या अर्जावरील सही आपली नसल्याचे सांगत आपला अर्ज वैध करावा, अन्यथा आपण येथेच आत्महदन करु, असा इशारा देत पणन महासंघाचा राजीनामा देत असल्याचे सांगत निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना दिला. त्यानंतर पानसरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनाबाहेर ठिय्या आंदोलन केले.



उमेदवारी अर्ज माघारीची मुदत दुपारी तीन वाजेपर्यंत होती. मात्र रात्री आठ वाजेपर्यंत पानसरे आपल्या भूमिकेवर ठाम राहील्याने याबाबत निर्णय होत नव्हता. जिल्हाधिकारी कार्यालयात दुपारी ३.१० मिनिटांनी सुरू झालेला गोंधळ रात्री साडेआठ वाजेपर्यंत चालू होता. पानसरे यांची प्रथम प्राजक्त तनपुरे यांनी समजूत काढली. तासभर चर्चा करून देखील पानसरे यांचे समाधान झाले नाही. अखेर आमदार संग्राम जगताप यांनी पानसरे यांच्याबरोबर चर्चा केली.

आ. जगताप यांनी पानसरे यांची पालकमंत्री विखे यांच्याबरोबर देखील चर्चा घडवून आणली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी देखील चर्चा घडवून आणली. त्यावेळी पानसरे यांनी पणन महासंघात भाजपच्या आमदारांकडून होणारा हस्तक्षेप तसेच पणन महासंघाची सुरू असलेल्या चौकशीबाबत मुख्यमंत्र्यांकडे दाद मागितली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी याबाबत योग्य तो निर्णय घेऊन पाच वर्ष महांसघाचे अध्यक्षपद पानसरे यांच्याकडे राहणार असल्याचे आश्वासन दिल्यानंतर पानसरे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची भूमिका घेतली.

दरम्यान, पानसरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना यापूर्वी दिलेल्या पत्रावरून पुन्हा लेखी पत्र दिले की, गैरसमजूतीतून उमेदवारी अर्ज माघारी घेण्याबाबत आक्षेप घेतला होता. सूचकाने दिलेला उमेदवारी अर्ज माघारीच्या पत्रावर माझी स्वाक्षरी असल्याचे मान्य केले. त्यामुळे पानसरे यांचा उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे भाजपचे उमेदवार प्राजक्त तनपुरे हे बिनविरोध निवडून आले. यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, प्राजक्त तनपुरे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड झाल्यानंतर त्यांनी माघार घेतलेल्या चारही उमेदवारांचे आभार मानले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावल्याचे सांगत त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील सर्व मतदार आणि नगरसेवकांच्या समस्या व प्रश्न विधिमंडळात प्रखरपणे मांडण्याचा विश्वासही तनपुरे यांनी यावेळी व्यक्त केला.

# SPOT NEWS

## अखेर मान्सून केरळमध्ये दाखल

● **मुंबई** – अखेर मोठ्या प्रतीक्षेनंतर केरळमध्ये मान्सून दाखल झाला. केरळमध्ये मान्सून ३ दिवस उशिराने दाखल झाला. याबाबत बोलताना प्रवीण कुमार वैज्ञानिक हवामान विभाग यांनी म्हटले की, मान्सून केरळमध्ये आला आहे. दक्षिण महाराष्ट्रात पुढच्या काही दिवसांत मान्सून दाखल होईल. विदर्भात १५ जूननंतरच मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. पुढचे २ ते ३ दिवस विदर्भातील काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट असून जोरदार वाऱ्यासह हलक्या पावसाचा अंदाज आहे. विदर्भातील जिल्ह्यात ढगाळ वातावरण असले तरी सध्या असेच तापमान कायम असेल, ४० ते ४२ डिग्री पर्यंत उन्हाचा पारा असेल. विदर्भात पुढील काही दिवस वादळीवाऱ्याचा मध्यमस्वरूपाचा पाऊस होईल. विदर्भासह राज्यात १५ जूनच्या आसपास मान्सून दाखल होईल. वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि वादळी वारा असणार आहे. पण अवकाळी पाऊस असेल, हा मान्सून पूर्व पाऊस नसेल. विदर्भाला मान्सूनसाठी अजून प्रतीक्षा कायम असणार आहे, मात्र १० जूननंतर परिस्थितीच्या अनुषंगाने याचा अंदाज घेता येईल.

## मतदारसंघ पुनर्रचना विधेयक पुन्हा संसदेत येणार

● **नवी दिल्ली** – देशाच्या राजकीय वर्तुळातून एक अत्यंत मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर येत असून केंद्र सरकार डिलिमिटेशन बिल पुन्हा एकदा संसदेत आणण्याच्या तयारीत आहे. मात्र, यावेळी सरकार हे विधेयक वन नेशन, वन इलेक्शन या प्रस्तावासोबत जोडून संयुक्तपणे मांडण्याचा विचार करत आहे. या मोठ्या आणि ऐतिहासिक संवैधानिक पावलापूर्वी केंद्र सरकार राजकीय पक्षांमध्ये एकमत आणि सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, याच रणनीतीचा एक भाग म्हणून सरकारने तृणमूल काँग्रेस आणि द्रमुक यांसारख्या प्रमुख प्रादेशिक पक्षांशी चर्चा सुरू केली असून त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. संसदेच्या आगामी मॉन्सून अधिवेशनापूर्वी विरोधी पक्षांचे समर्थन मिळवणे हा सरकारचा मुख्य उद्देश आहे. जर संसदेत आवश्यक संख्याबळ म्हणजेच दोन-तृतीयांश बहुमत सुनिश्चित झाले, तर सरकार मतदारसंघ पुनर्रचना आणि एक देश एक निवडणूक या दोन्ही महत्त्वाच्या विषयांचे संयुक्त विधेयक संसदेत सादर करू शकते. विशेष म्हणजे, टीएमसीच्या काही बड्या नेत्यांनी यावर खुली चर्चा करण्याची तयारी दर्शवली आहे, तर पूर्वी कडाडून विरोध करणारी डीएमकेदेखील यावेळी मवाळ भूमिकेत असून सुधारित प्रस्तावाची वाट पाहत आहे. लोकसभेतील एकूण ५२९ सदस्यांपैकी केवळ २९८ सदस्यांनी या प्रस्तावाच्या बाजूने मतदान केले होते, तर २३० सदस्यांनी याला विरोध दर्शवला होता. असे दुरुस्ती विधेयक संसदेत मंजूर करून घेण्यासाठी किमान ३५२ मतांची अत्यंत आवश्यकता असते.

# अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील ३०० कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

जिल्हा पोलीस दलातील चालू वर्षातील सुमारे ३०० पोलीस कर्मचार्यांच्या प्रशासकीय बदल्या गुरूवारी (४ जून) पोलीस मुख्यालयात पार पडल्या. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी आयोजित केलेल्या बदली दरबारात प्रत्येक कर्मचार्याची भूमिका, गरज आणि पसंती जाणून घेत बदली प्रक्रिया राबविण्यात आली. या प्रक्रियेत काहींना मनासारखे पोलीस ठाणे मिळाल्याने आनंदाचे वातावरण होते, तर काहींना अपेक्षित ठिकाण न मिळाल्याने नाराजी आणि भावनिक क्षणही पाहायला मिळाले.

एका पोलीस ठाण्यात किंवा शाखेत सलग अथवा खंडित स्वरूपात पाच वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या कर्मचार्यांकडून यापूर्वी तीन पसंतीच्या ठिकाणांसह अर्ज मागविण्यात आले होते. बदलीपात्र कर्मचार्यांना गुरूवारी सकाळी पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले होते. प्रत्येक अंमलदाराशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांची भूमिका जाणून घेतल्यानंतर बदलीचे आदेश देण्यात आले. सकाळी साडेआठ वाजता सुरू झालेल्या या प्रक्रियेला पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्यासह अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे उपस्थित होते.

बदली प्रक्रियेत प्रथम श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, सहायक फौजदार आणि पोलीस हवालदार यांच्या बदल्या करण्यात आल्या. गुन्हे तपासाची जबाबदारी असलेल्या या अंमलदारांपैकी अनेक जण गेल्या अनेक वर्षांपासून अहिल्यानगर शहर व परिसरातील पोलीस ठाण्यांमध्ये कार्यरत होते. त्यामुळे जिल्ह्याच्या उत्तर व दक्षिण भागातील काही पोलीस ठाण्यांमध्ये तपास अंमलदारांची कमतरता निर्माण झाली होती. ही तूट भरून काढण्यासाठी काही तपास अंमलदारांच्या बदल्या त्यांच्या पसंतीपेक्षा रिक्त जागांचा विचार करून करण्यात आल्या. मात्र, काही कर्मचार्यांना अपेक्षित पोलीस ठाणे न मिळाल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. काही महिला पोलिसांच्या डोळ्यांत अश्रूही दिसून आले. त्यानंतर पोलीस नाईक, पोलीस शिपाई आणि चालक यांच्या बदल्या करण्यात आल्या. या कर्मचार्यांच्या पसंतीचा मोठ्या प्रमाणावर विचार झाल्याने अनेकांनी समाधान व्यक्त केले.

दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेत (एलसीबी) बदली मिळावी, अशी अनेक कर्मचार्यांची इच्छा होती. अर्जातील पसंतीक्रमात एलसीबीचा समावेश असतानाही अधीक्षक सुदर्शन यांनी कोणालाही एलसीबीमध्ये बदली दिली नाही. त्यामुळे एलसीबीत जाण्याची अपेक्षा बाळगणाऱ्या कर्मचार्यांचा हिरमोड झाला. काही पोलिसांनी विनंती बदल्यांसाठी अर्ज केले असले तरी त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. सध्या केवळ प्रशासकीय बदल्या करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

# ‘पुस्तकांचे गाव’ उपक्रमाचे प्रभावी नियोजन करा : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी आणि ग्रामीण भागात ज्ञानाचा प्रसार व्यापक करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या ‘पुस्तकांचे गाव’ या महत्त्वाकांक्षी योजनेची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून उपक्रमाचे सुसूत्र नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात ‘पुस्तकांचे गाव-विस्तार’ योजनेअंतर्गत जिल्ह्यात ‘पुस्तकांचे गाव’ उभारण्याबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, तहसीलदार नागेश गायकवाड, जिल्हा ग्रंथालय निरीक्षक रामदास शिंदे, मराठी भाषा समिती सदस्य किशोर मरकड, संजय कळमकर, शशिकांत नजन तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, वाचन संस्कृती ही समाजाच्या बौद्धिक विकासाचा पाया आहे. ग्रामीण भागातील नागरिक, विद्यार्थी आणि युवकांना दर्जेदार साहित्य सहज उपलब्ध व्हावे, यासाठी ‘पुस्तकांचे गाव’ ही संकल्पना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ज्ञान, साहित्य आणि संस्कृतीचा प्रसार अधिक प्रभावीपणे होण्यास मदत होईल.

पुस्तकांचे गाव उभारताना स्थानिक वैशिष्ट्ये, उपलब्ध जागा, वाचन संस्कृतीची परंपरा तसेच पर्यटनविकासाची क्षमता यांचा विचार करावा. हा उपक्रम केवळ पुस्तक विक्री किंवा प्रदर्शनापुरता मर्यादित न ठेवता वाचन प्रेरणा उपक्रम, साहित्यिक कार्यक्रम, ग्रंथदालन, अभ्यासिका आणि सांस्कृतिक उपक्रमांचा समावेश असलेले ज्ञानकेंद्र विकसित करण्यावर भर द्यावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीत ‘पुस्तकांचे गाव-विस्तार’ योजनेच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील संभाव्य ठिकाणे, उपलब्ध सुविधा, आवश्यक पायाभूत व्यवस्था तसेच उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी करण्यात येणाऱ्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला.

# विधानपरिषद निवडणूक बिनविरोध; जिल्ह्यात भाजप-महायुतीची ताकद पुन्हा अधोरेखित

## प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड । सुजय विखे पाटील-संग्राम जगताप यांच्या समन्वयाची राजकीय वर्तुळात चर्चा

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

विधानपरिषद निवडणुक जागा बिनविरोध करून दाखवत भारतीय जनता पक्षा सह महायुतीने राजकीय पातळीवर महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. अपेक्षेप्रमाणे भाजपचे उमेदवार प्राजक्त तनपुरे हे बिनविरोध निवडून आले असून, या घडामोडीमुळे जिल्ह्यात भाजपची संघटनात्मक ताकद आणि राजकीय प्रभाव पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

महाविकास आघाडीकडून ही जागा काँग्रेसच्या वाट्याला गेल्याचे सुरुवातीला सांगितले जात होते. मात्र काँग्रेसकडून कोणत्याही अधिकृत उमेदवाराने अर्ज दाखल केला नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कडून राणी लंके यांचे नाव चर्चेत आले होते. त्या अर्ज दाखल करतील, अशी चर्चा होती. मात्र अखेर महाविकास आघाडीकडून एकाही उमेदवाराने अर्ज भरला नाही.

अर्ज मागे घेण्याच्या अंतिम टप्प्यापर्यंत भाजपचे प्राजक्त तनपुरे, श्रीरामपूरचे नगराध्यक्ष करण ससाणे, श्रीगोंद्याचे राष्ट्रवादीचे कार्यकर्ते दत्तात्रय पानसरे, तसेच कमलेश गांधी आणि मच्छिंद्र धुमाळ यांचे अर्ज शिल्लक होते. गुरुवारी दुपारपर्यंत मच्छिंद्र धुमाळ आणि कमलेश गांधी यांनी आपले अर्ज मागे घेतले.



दरम्यान, काही काळासाठी करण ससाणे हे संपर्काबाहेर गेल्याने राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र त्यांनीही अचानक समोर येत आपला अर्ज मागे घेतला. त्यानंतर प्राजक्त तनपुरे यांच्या विरोधातील एकमेव अर्जदार राहिलेले दत्तात्रय पानसरे यांची मनधरणी करण्यात महायुतीला यश आले. अर्ज मागे घेण्याच्या मुदतीच्या अखेरच्या काही मिनिटांत त्यांनीही माघार घेतल्याने प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली. विशेष म्हणजे, नुकतेच भाजपमध्ये प्रवेश केलेले प्राजक्त तनपुरे हे आता अहिल्यानगर जिल्ह्यातील १८ वे आमदार ठरले आहेत.

### संग्राम - सुजय जय वीरूच्या जोडीने केली कमाल

▪ विशेष म्हणजे या संपूर्ण राजकीय घडामोडीत डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या समन्वयाचीही मोठी चर्चा रंगली. उमेदवारी अर्ज माघारीच्या अंतिम टप्प्यात दत्तात्रय पानसरे यांनी अर्ज बळजबरीने किंवा खोट्या सहीने मागे घेतल्याचा आरोप केल्याने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र त्यानंतर आमदार संग्राम जगताप आणि दत्तात्रय पानसरे यांच्यात बंद दाराआड सविस्तर चर्चा झाली. चर्चेनंतर दोघेही एकाच वाहनातून बाहेर पडल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले. अखेर पानसरे यांची समजूत काढण्यात यश आले आणि त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातून बाहेर पडत माघारीची भूमिका कायम ठेवली. त्यामुळे प्राजक्त तनपुरे यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. या संपूर्ण प्रक्रियेत डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी घेतलेल्या पुढाकारामुळेच शेवटच्या क्षणी निर्माण झालेला पेच सुटल्याची चर्चा सुरू असून, राजकीय वर्तुळात या जोडीची तुलना जय-वीरू जोडीशी केली जात आहे.

### भाजपच्या संघटनशक्तीचे प्रदर्शन

▪ अहिल्यानगर महानगरपालिका आणि जिल्ह्याच्या राजकारणात भाजपची वाढती संघटनात्मक ताकद या निकालातून पुन्हा एकदा स्पष्ट झाली आहे. सर्वपक्षीय समन्वय, संवादकौशल्य आणि संघटन व्यवस्थापनाचेही दर्शन घडविल्याची प्रतिक्रिया राजकीय जाणकारांकडून व्यक्त होत आहे. या घडामोडींमुळे अहिल्यानगर जिल्ह्यात भाजपचे राजकीय वर्चस्व आणखी बळकट झाल्याची चर्चा सुरू असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या विजयाकडे महत्त्वपूर्ण राजकीय संदेश म्हणून पाहिले जात आहे.

### डॉ. सुजय विखे पाटील यांच्या भूमिकेची चर्चा

▪ या बिनविरोध विजयामागे गेल्या चार दिवसांपासून डॉ. सुजय विखे पाटील यांनी घेतलेले प्रयत्न महत्त्वाचे ठरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचा उमेदवार बिनविरोध निवडून आणण्यासाठी पक्षाने दिलेली जबाबदारी त्यांनी प्रभावीपणे पार पाडल्याचे मानले जात आहे.यापूर्वी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरही प्राजक्त तनपुरे यांना निवडणूक लढविण्यापासून परावृत्त करत अक्षय कर्डिले यांचा मार्ग मोकळा करण्यात डॉ. सुजय विखे पाटील यांची भूमिका महत्त्वाची ठरल्याची चर्चा झाली होती. त्यानंतर आता विधानपरिषद निवडणूक बिनविरोध घडवून आणण्यातही त्यांचे योगदान निर्णायक ठरल्याचे बोलले जात आहे.

# एमआरपीच्या नावाखाली ग्राहकांची लूट थांबवा

## अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन | ग्राहक हक्क संरक्षणासाठी जनजागृती आंदोलन

**● अहिल्यानगर | वीरभूमी –**

वस्तूंच्या छापील किमतीपेक्षा (एमआरपी) अधिक दराने विक्री करून ग्राहकांची होणारी आर्थिक फसवणूक थांबवावी, तसेच देशात एमआरपी संदर्भात सक्षम व प्रभावी कायदा करण्यात यावा, या मागणीसाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत, अहिल्यानगर जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शांततापूर्ण जनजागृती आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष शाहूराव औटी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. प्रशासनाला सादर केलेल्या निवेदनात ग्राहकांच्या विविध ज्वलंत समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

निवेदनात भारत सरकारने एमआरपी (कमाल किरकोळ किंमत) संदर्भात तातडीने सक्षम व सुधारित कायदा करावा, तसेच एमआरपीची पडताळणी करण्यासाठी स्वतंत्र वैधानिक प्राधिकरणाची स्थापना करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. बाजारातील वाढीव एमआरपी, खोटी सूट आणि दिशाभूल करणाऱ्या किंमत धोरणांवर कठोर निर्बंध आणावेत, अशीही




मागणी करण्यात आली.

वस्तूंच्या किमतीत पारदर्शकता आणण्यासाठी प्रत्येक उत्पादनावर एमआरपीसोबतच त्याचा मूळ उत्पादन खर्च छापणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक करण्यात यावे, अशी सूचना ग्राहक पंचायतीने केली आहे. तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित औषधे व इतर अत्यावश्यक वस्तूंच्या किमतींवर विशेष नियंत्रण यंत्रणा लागू करून औषध कंपन्यांकडून होणारी लूट थांबविण्याची मागणीही करण्यात आली आहे.

यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना जिल्हाध्यक्ष शाहूराव औटी म्हणाले, सध्या बाजारपेठेत अनेक ठिकाणी ग्राहकांकडून छापील किमतीपेक्षा (एमआरपी) अधिक दर आकारले जात आहेत. किमतींमध्ये पारदर्शकतेचा मोठा अभाव असून सर्वसामान्य नागरिकांना दररोज आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे आणि त्यांच्यात जागृती निर्माण व्हावी, यासाठी आम्ही संविधानिक व शांततेच्या मार्गाने हे आंदोलन करीत आहोत.

प्रशासनाने या आंदोलनाची गांभीर्याने दखल घेऊन दोषी व्यापारी व ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाईसाठी हे निवेदन केंद्र व राज्य शासनाकडे तातडीने पाठवावे, अशी विनंती ग्राहक पंचायतीच्या वतीने करण्यात आली.

या आंदोलनात ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष शाहूराव औटी, प्रांत कोषाध्यक्ष विलास जगदाळे, सचिव दिनेश थोरात, प्रांत कार्यकारिणी सदस्य अतुल कुऱ्हाडे, महिला अध्यक्षा अमिता कोहली, पद्मा दायमा, उपाध्यक्ष अशोक शेवाळे, सुरेश रहाणे, सहसचिव जितेंद्र पितळे, सीताराम बोरुडे, हरिभाऊ चौधरी, अप्पासाहेब औटी, पारनेर तालुकाध्यक्ष शहाजी पांढरे, सुनील गोरे, डॉ. रजनीकांत पुंड, रामचंद्र सुपेकर, संदीप गवळी, सतीश भोईटे, प्रकाश रासकर, अनंता पवार, रामकृष्ण थोटे, रवींद्र शेळके, गोरख बोडखे, विनोद पेंटा, ऋषिकेश शिंदे, ज्ञानेश्वर फसले, विजय काथवटे, रामचंद्र अनारसे, विजय कवडीवाले, जयश्री घोडके, अर्जुन गोंधळी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने जागरूक नागरिक सहभागी झाले होते.

# SPOT NEWS

## कॉन्ट्रॅक्ट न मिळाल्याच्या रागातून एचआर हेडवर हल्ला

**● पारनेर | वीरभूमी –**

तालुक्यातील म्हसणेफाटा एमआयडीसी परिसरातील सिलॉन बेव्हरेज कॅन प्रा. लि. कंपनीच्या एचआर हेडवर हल्ला करून लुटमार केल्याप्रकरणी सुपा पोलिसांनी कारवाई करत काही आरोपींना अटक केली असून इतरांचा शोध सुरू आहे. या प्रकरणात खासदार निलेश लंके यांच्या युवक प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सोशल मीडिया प्रमुख सतीश मोहन भालेकर यांनी कट रचल्याचा आरोप पोलिसांच्या प्रेस नोटमध्ये करण्यात आला आहे. सुपा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिलॉन बेव्हरेज कॅन प्रा. लि. कंपनीमध्ये कॉन्ट्रॅक्ट मिळवून देण्याच्या कारणावरून संबंधितांकडून कंपनीच्या एचआर हेड यांच्यावर दबाव टाकण्यात आला होता. कॉन्ट्रॅक्ट न मिळाल्याचा राग मनात धरून आरोपींनी कट रचल्याचा आरोप आहे. त्यानंतर कंपनीच्या एचआर हेड यांची मोटारसायकल अडवून त्यांना मारहाण करण्यात आली तसेच त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन हिसकावून नेण्यात आल्याची तक्रार दाखल करण्यात आली. या प्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून वैभव रामदास रिकामे याला अटक करण्यात आली आहे. तसेच दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना बालन्याय मंडळासमोर हजर करण्यात आले आहे. अन्य आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके कार्यरत आहेत. सुपा पोलीस ठाण्याच्या वतीने एमआयडीसी परिसरातील सर्व उद्योग व्यवस्थापकांना आवाहन करण्यात आले आहे की, कॉन्ट्रॅक्ट मिळवून देण्याच्या नावाखाली कोणी दबाव टाकत असल्यास, पैशांची मागणी करत असल्यास किंवा धमकी देत असल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई व नुकसानभरपाईची मागणी

**● अहिल्यानगर | वीरभूमी –**

सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी कोणतीही पूर्वसूचना, कायदेशीर नोटीस किंवा सक्षम आदेश न देता गाईचा गोठा, दुकान, पत्र्याचे शेड आणि लोखंडी पिंजरे पाडून सुमारे ३० ते ३५ लाख रुपयांचे नुकसान केल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते स्टीफन दिलीप पंचमुख यांनी केला आहे. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करून नुकसानभरपाई देण्याची मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. न्यू बेथेल कॉलनी, कोठी पाटील हॉस्पिटलजवळ राहणारे स्टीफन पंचमुख यांनी दिलेल्या निवेदनानुसार, क्लेरा ब्रूस बॉईज हायस्कूल मैदान परिसरातील वाईंडर चर्च मिनिस्ट्री संस्थेने त्यांना उदरनिर्वाहासाठी जागा उपलब्ध करून दिली होती त्या जागेमध्ये स्टीफन पंचमुख यांनी दुकान पत्राचे शेड पिंजरे गोठा इत्यादी तयार केले होते व त्यामध्ये त्यांनी २० गायी, १४ वासरे, १३ बकऱ्या तसेच जर्मन शेफर्ड, लॅब्राडोर, डॉबरमन, गोल्डन रिट्रिव्हर आणि हस्की जातीच्या कुत्र्यांसाठी गोठा व लोखंडी पिंजरे उभारले होते. याच ठिकाणी त्यांचे दुकानही सुरू होते. पंचमुख यांनी म्हटले आहे की, क्लेरा ब्रूस बॉईज हायस्कूल मैदानाच्या मालकीचा वाद न्यायालयात प्रलंबित असून अंतिम निर्णय होईपर्यंत संबंधित क्षेत्र तहसीलदारांच्या ताब्यात राहील, असे न्यायालयाचे आदेश आहेत. विशेष म्हणजे, १५ मार्च २०२६ रोजी सामाजिक वनीकरण विभागाच्या वनपालांनी दिलेल्या अहवालात सदर जमीन खडकाळ उताराची असून लागवडीसाठी योग्य नसल्याने प्रस्तावित काम रद्द करण्यात आल्याचे लेखी नमूद करण्यात आले होते. असे असताना ४ एप्रिल २०२६ रोजी कोणाच्या आदेशावरून जमीन नांगरणी, सपाटीकरण आणि तोडफोड करण्यात आली, असा सवाल पंचमुख यांनी उपस्थित केला आहे. या घटनेबाबत तयार करण्यात आलेल्या सरकारी पंचनाम्यातही तोडफोडीची नोंद असल्याचे त्यांनी सांगितले.

## हॉकी स्पर्धेसाठी ऐम स्पोर्ट्स अकॅडमीच्या १२ खेळाडूंची महाराष्ट्र संघात निवड

**● अहिल्यानगर | वीरभूमी –**

अहिल्यानगरच्या ऐम स्पोर्ट्स अकॅडमीच्या १२ खेळाडूंची राष्ट्रीय आइस हॉकी अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली असून, या यशामुळे जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. या खेळाडूंचा जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे व बाळासाहेब खोमणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंमध्ये अंडर-१२ मुलांच्या गटातून राजवीर जगताप याची निवड झाली आहे. अंडर-१२ मुलींच्या गटातून मतीशा सोनवणे, अर्फा खान आणि तनया क्यादर यांनी महाराष्ट्र संघात स्थान मिळवले आहे. अंडर-१५ मुलांच्या गटातून भावेश वाघ याची निवड झाली असून अंडर-१८ मुलांच्या गटातून ईशांत गर्जे, अर्श मुलाणी आणि आयुष पगारे यांना संधी मिळाली आहे. वरिष्ठ पुरुष गटात वेदांत गर्जे, कार्तिक मिश्रा, आदित्य मरकड यांची निवड झाली असून, वरिष्ठ महिला गटात अभिजिता जगताप हिने महाराष्ट्र संघात स्थान पटकावले आहे. विविध वयोगटांमधून एकाच अकॅडमीच्या १२ खेळाडूंची झालेली निवड ही अभिमानास्पद ठरली आहे.

## अवतार मेहेर बाबा ट्रस्टशी लाल बावटा युनियनचे पगारवाढीचा करार; तीन वर्षांसाठी कामगारांना मिळणार ४,८०० पगारवाढ

**● अहिल्यानगर | वीरभूमी –**

लाल बावटा जनरल कामगार युनियन संलग्न अवतार मेहेर बाबा कामगार युनियन आणि अवतार मेहेर बाबा ट्रस्ट यांच्यातील नवीन वेतनवाढ करार बुधवारी (दि. ४ जून) सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात पार पडला. सहाय्यक कामगार आयुक्त रे. मु. भोसले यांच्या उपस्थितीत युनियनचे पदाधिकारी आणि ट्रस्टच्या विश्वस्तांनी करारावर स्वाक्षऱ्या करून पुढील तीन वर्षांसाठी कामगारांच्या वेतन व विविध सुविधांबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला.

सन २०२३ ते २०२६ या कालावधीतील विद्यमान करार मार्च २०२६ मध्ये संपुष्टात आल्यानंतर नवीन करारासाठी कामगार संघटना आणि ट्रस्ट यांच्यात अनेक फेऱ्यांच्या बैठका झाल्या. दोन्ही बाजूंनी सकारात्मक भूमिका घेतल्याने कोणताही औद्योगिक वाद निर्माण न होता तडजोडीने हा करार करण्यात आला. यासाठी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात डिमांड नोटीस सादर करण्यात आली होती.



नवीन करारानुसार सन २०२६ ते २०२९ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी कामगारांना एकूण ४,८०० इतकी वेतनवाढ देण्यात येणार आहे. ही वाढ टप्प्याटप्प्याने लागू केली जाणार असून दरवर्षी १,६०० प्रमाणे वेतनवाढ मिळणार आहे. याशिवाय दिवाळी बोनस व भेट रक्कम मिळून पूर्वीपेक्षा १,५०० ची वाढ करण्यात आली असून आता कामगारांना ९,५०० इतका बोनस मिळणार आहे. कामगारांच्या कुटुंबीयांच्या शैक्षणिक गरजांचाही विचार करण्यात आला असून कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी पात्रतेनुसार १२ हजारांपर्यंत शैक्षणिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पूर्वी मिळणारे इतर सर्व लाभ नियमांनुसार कायम राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

नवीन करारावर स्टच्या वतीने विश्वस्त रमेश जंगले व युनियनच्या वतीने लाल बावटाचे जिल्हा सचिव कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, कॉ. ॲड. सुभाष लांडे, युनिट अध्यक्ष सतीश पवार यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी व्यवस्थापन लेबर ऑफिसर श्रीनिवास वंगार यांच्यासह उपाध्यक्ष संजय कांबळे, सचिव विजय भोसले, सुभाष शिंदे, प्रविण भिंगारदिवे, सुनिता जावळे, सुनिल दळवी, राधाकिसन कांबळे, चंद्रकला देशमुख, श्रीनाथ पाटोळे, रामदास कल्हापूरे, गणेश गहिले, राजेंद्र मोरे, दिगंबर माने आदी उपस्थित होते.

## दैनिक वीरभूमीचे तालुका प्रतिनिधी अनिल खाटेर यांना आधार फाऊंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार जाहीर

**● पाथर्डी | वीरभूमी –**

पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत आधार फाउंडेशनच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार २०२६ जाहीर झाला असून पाथर्डी तालुक्यातील पत्रकार अनिलकुमार रामचंद्र खाटेर यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे पत्रकारिता क्षेत्रासह सामाजिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

आधार फाउंडेशन आणि एस.आर. २४ न्यूज वृत्तवाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येत असून, दि. १३ जून रोजी राहुरी येथे मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यभरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या सोहळ्यात गौरविण्यात येणार आहे.



अनिल खाटेर यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रश्न, सामाजिक घडामोडी, लोकहिताचे विषय, प्रशासनातील सकारात्मक कामे तसेच सर्वसामान्यांच्या समस्या सातत्याने आणि निर्भीडपणे मांडल्या आहेत. त्यांच्या वस्तुनिष्ठ, अभ्यासपूर्ण आणि जनसामान्यांशी नाळ जोडणाऱ्या पत्रकारितेची दखल घेत हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, पत्रकारिता क्षेत्रातील अनिल खाटेर यांना मिळालेला हा दुसरा राज्यस्तरीय पुरस्कार असून, यापूर्वीही त्यांच्या कार्याचा गौरव झाला आहे.

पत्रकारितेबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत विविध लोकहिताच्या विषयांवर सातत्याने आवाज उठविण्याचे कार्य त्यांनी केले आहे. ग्रामीण भागातील विकासकामे, शेतकरी प्रश्न, शिक्षण, आरोग्य, सामाजिक उपक्रम आणि जनसामान्यांच्या अडचणी यांना त्यांनी आपल्या लेखणीतून योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे वाचकांमध्ये तसेच समाजातील विविध घटकांमध्ये त्यांची विश्वासार्ह ओळख निर्माण झाली आहे.

पुरस्काराची घोषणा होताच पत्रकार, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, शासकीय अधिकारी, शिक्षक, उद्योजक तसेच विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. सोशल मीडियावरही शुभेच्छांचा वर्षाव होत असून, आगामी काळातही समाजाभिमुख आणि निष्पक्ष पत्रकारितेची परंपरा अधिक सक्षमपणे पुढे नेण्याचा विश्वास अनेकांनी व्यक्त केला आहे. लेखणीच्या माध्यमातून समाजहित जपणाऱ्या पत्रकाराचा हा सन्मान असून, पाथर्डी तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे, अशा भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहेत.

## वाकी-मान्हेरे शिवारातील पोल्ट्री फार्मविरोधात ग्रामस्थ आक्रमक

### प्रदूषण व आरोग्यविषयक समस्यांचा आरोप | अनधिकृत पोल्ट्री फार्म तात्काळ बंद करण्याची मागणी

**● अकोले | वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील मान्हेरे व वाकी शिवारालगत नव्याने सुरू झालेल्या पोल्ट्री फार्ममुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप करत संबंधित पोल्ट्री फार्म तात्काळ बंद करण्यात यावा, अशी मागणी मान्हेरे (भांगरे वाडी) येथील ग्रामस्थांनी केली आहे.

याबाबत ग्रामस्थांनी उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) यांना निवेदन दिले असून त्याच्या प्रती तहसीलदार, अकोले, आमदार किरण लहामटे तसेच पोलिस निरीक्षक यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

निवेदनात म्हटले आहे की, मान्हेरे व वाकी शिवारालगत सुरू झालेल्या पोल्ट्री फार्ममुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरत असून नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना श्वसनासंबंधी त्रास होत असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

तसेच मृत कोंबड्या व पोल्ट्रीमधील विष्ठेची उघड्यावर अयोग्य पद्धतीने विल्हेवाट लावली



जात असल्याने परिसरात माशांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यामुळे कॉलरा, जुलाब, बर्ड फ्लू यांसारख्या संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाल्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

सदर पोल्ट्री फार्मने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे 'कन्सेंट टू ऑपरेट' प्राप्त केले आहे का, तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले जात आहे का, याची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

पोल्ट्री फार्मसाठी आवश्यक परवानग्या व कागदपत्रे योग्य पद्धतीने सादर करण्यात आली आहेत का, याचीही पडताळणी करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. संबंधित ठिकाणाची प्रत्यक्ष पाहणी करून प्रदूषणाची तपासणी करण्यात यावी व नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

जनहिताच्या दृष्टीने सदर पोल्ट्री फार्म तातडीने बंद करण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

या निवेदनावर लहु मारुती गभाले, अरुण रावजी गाभाले, मच्छिंद्र धुंदा बांबळे, दशरथ धुंदा बांबळे, धुंदा सोमा बांबळे, छबाबाई धुंदा बांबळे, गोरख धुंदा बांबळे, उषा गोरख बांबळे, धोंडाबाई काशिनाथ बांबळे, चिंतामण सोमा बांबळे, विठ्ठल धोंडू किरवे यांच्यासह मान्हेरे (भांगरे वाडी) येथील अनेक ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

# न्यू आर्ट्स पारनेर महाविद्यालयाच्या २१ विद्यार्थ्यांची 'ईटन' कंपनीत निवड

## कॅम्पस मुलाखतीत घवघवीत यश | ग्रामीण विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या रोजगाराच्या संधी

**● पारनेर | वीरभूमी –**

पारनेर येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेतही आपला ठसा उमटवला आहे. महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या जागतिक स्तरावरील नामांकित 'ईटन प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीच्या कॅम्पस मुलाखतींमध्ये तब्बल २१ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या यशामुळे महाविद्यालयासह संपूर्ण पारनेर तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून या विशेष निवड प्रक्रियेचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पस ड्राइव्हमध्ये ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कंपनीच्या प्रतिनिधींनी विविध फेऱ्यांमधील कामगिरी, तांत्रिक ज्ञान आणि कौशल्यांच्या आधारे २१ विद्यार्थ्यांची अंतिम निवड केली.

मुलाखतीदरम्यान विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधींबरोबरच कॉर्पोरेट क्षेत्रातील करिअर, औद्योगिक कौशल्ये, प्रभावी संवादकौशल्य, आत्मविश्वास आणि व्यावसायिक शिस्त याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये भागवत ज्ञानेश्वरी बबन, नवले आदेश भास्कर, काकडे सायली संदीप, गौरी सुनील काळे, नऱ्हे अर्चना सुदाम, गाडेकर दिव्या प्रदीप, जाधव निखिल संतोष, प्रतिभा बाबर, ठुबे शुभम रामदास, बेरड पवन बबन, जाधव शांतनू माधव, वाळुंज संतोष मल्हारी, तिकोणे विनायक गंगाधर, इनामदार अझरुद्दीन इनुस, पवार शिवतेज आबाजी, वाळुंज ज्ञानेश्वरी बाबासाहेब, बेलोटे वैष्णवी, ललिता उदार, बुंदे वैष्णवी श्रीहरी, पोटे रुपाली बाळासाहेब आणि गाडीलकर सोनल राजेंद्र यांचा समावेश आहे.

कॅम्पस मुलाखतींच्या वेळी प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर, उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे तसेच अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगार्डे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. आहेर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, ज्येष्ठ विश्वस्त माजी आमदार नंदकुमार झावरे पाटील, जी. डी. खानदेशे, सिताराम खिलारी, डॉ. चंद्रकांत मोरे, जयंत वाघ तसेच संस्थेच्या सर्व सदस्यांनी विद्यार्थ्यांचे आणि महाविद्यालयाचे अभिनंदन केले आहे.

हा कॅम्पस ड्राइव्ह यशस्वी करण्यासाठी



प्लेसमेंट सेलचे समन्वयक प्रा. सागर म्हस्के, प्रा. मनीष पागिरे आणि प्रा. ज्ञानेश्वर गुलगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# SPOT NEWS

## भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कच्या सुशोभीकरणासाठी निधीची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

भिंगार कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कच्या सुशोभीकरणासाठी व विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांच्याकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ व सचिन चोपडा यांनी आमदार जगताप यांना निवेदन देऊन उद्यानातील प्रलंबित कामांकडे लक्ष वेधले. भिंगार परिसरातील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क हे नागरिकांसाठी आरोग्यदायी व नैसर्गिक वातावरण उपलब्ध करून देणारे महत्त्वाचे ठिकाण आहे. या उद्यानात दररोज शहरासह भिंगार उपनगर आणि पंचक्रोशीतील शेकडो नागरिक सकाळ-संध्याकाळ फिरण्यासाठी, व्यायामासाठी तसेच आरोग्य संवर्धनासाठी येत असतात. नागरिकांच्या सहभागातून हरदिन मॉर्निंग ग्रुपने उद्यान परिसरात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाची व्यापक मोहीम राबवून हिरवळ फुलविण्याचे काम केले आहे. तसेच वेळोवेळी उद्यानाची देखभाल आणि स्वच्छता राखण्याचे प्रयत्नही करण्यात येते. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, कॅन्टोन्मेंट बोर्डाकडून उद्यानाकडे लक्ष दिले जात असले तरी निधीअभावी अनेक आवश्यक विकासकामे रखडली आहेत. त्यामुळे आमदार निधीतून या उद्यानासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. उद्यानातील विकासकामांमध्ये प्राधान्याने जॉगिंग ट्रॅक व पादचारी मार्गांवर पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी, याशिवाय उद्यानात येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी पिण्याच्या पाण्याचे कुलर, ज्येष्ठ नागरिकांसाठी झाडांच्या भोवती बसण्याचे कट्टे, आधुनिक ओपन जिम तसेच इतर सुशोभीकरणाच्या कामांसाठी निधीची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच उद्यान परिसरात रात्रीच्या वेळी पुरेसा प्रकाश उपलब्ध व्हावा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेत वाढ व्हावी यासाठी सर्वत्र लाईट पोल बसविण्याची मागणी करण्यात आली आहे. भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क हे शहर व उपनगरातील नागरिकांसाठी आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक संवादाचे महत्त्वाचे केंद्र बनले असून त्याचा सर्वांगीण विकास झाल्यास नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील. त्यामुळे या उद्यानाच्या विकासासाठी भरघोस निधी मंजूर करून कामे तातडीने मार्गी लावावीत, अशी मागणी हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने करण्यात आली आहे. निवेदनावर सीए रविंद्र कटारिया, इंजि. नागेश खुरपे, चुन्नीलाल झंवर, वसंत बोरा, ॲड. सुभाष काकडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## निमगाव वाघात एस.टी. प्रवास सवलतींसाठी स्मार्ट कार्ड नोंदणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

निमगाव वाघा (ता. नगर) येथे एकता फाऊंडेशनच्या वतीने ग्रामस्थांच्या सोयीसाठी एस.टी. महामंडळाच्या प्रवासासाठी आवश्यक असलेल्या स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच विविध घटकांतील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ग्रामपंचायत कार्यालयासमोर असलेल्या नवनाथ मंदिराच्या सभामंडपात हे शिबिर पार पडले. ग्रामीण भागातील नागरिकांना एसटीच्या योजनांचा लाभ सहजपणे मिळावा आणि प्रवासासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी दूरवर जावे लागू नये, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरादरम्यान महिलांनी तसेच ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली. या कार्डच्या माध्यमातून महिलांना एस.टी. प्रवासात ५० टक्के सवलतीचा लाभ मिळणार असून ज्येष्ठ महिला व पुरुषांनाही अर्ध्या तिकिटाची सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच वयोवृद्ध नागरिकांना शासनाच्या धोरणानुसार मोफत प्रवासाचा लाभ घेण्यासाठीही हे स्मार्ट कार्ड उपयुक्त ठरणार आहे. या प्रसंगी निमगाव वाघा विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन तथा एकता फाऊंडेशनचे अध्यक्ष अतुल फलके, बाबासाहेब जगदाळे, भाऊसाहेब (पिंटू) जाधव, अजय ठाणगे, ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, सुधीर येणारे, सुनील कापसे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतुल फलके म्हणाले की, ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या विविध सवलती आणि सुविधा सहज उपलब्ध करून देण्यासाठी एकता फाऊंडेशनच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येतात. शासनाच्या विविध योजनांचा लाभ ग्रामीण भागातील प्रत्येक पात्र व्यक्तीपर्यंत पोहोचला पाहिजे, हा आमचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. अनेक वेळा आवश्यक कागदपत्रे, माहितीचा अभाव किंवा प्रवासाची अडचण यामुळे नागरिकांना या सुविधांचा लाभ घेता येत नाही. हीच अडचण दूर करण्यासाठी एकता फाऊंडेशनने हा उपक्रम राबविल्याचे त्यांनी सांगितले. स्मार्ट कार्ड हे केवळ एक कार्ड नसून नागरिकांच्या आर्थिक बचतीचे आणि सुलभ प्रवासाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. महिलांना अर्ध्या तिकिटाची सुविधा, ज्येष्ठ नागरिकांना विशेष सवलत आणि वयोवृद्धांना मोफत प्रवासाचा लाभ मिळण्यासाठी हे कार्ड अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

# कर्जमाफीतील जाचक अटींविरोधात भूमिपुत्र शेतकरी संघटना आक्रमक

### देसवडे येथे कर्जमाफीच्या शासन निर्णयाची होळी । सरसकट कर्जमाफीची मागणी

**● पारनेर । वीरभूमी –**

कर्जमाफीसाठी राज्य सरकारने जाहीर केलेल्या शासन निर्णयामध्ये अत्यंत जाचक अटी व शर्ती लागू करण्यात आल्याचा आरोप करत त्या तातडीने रद्द करण्याची मागणी भूमिपुत्र शेतकरी संघटनेने केली आहे. या पार्श्वभूमीवर पारनेर तालुक्यातील देसवडे येथे शेतकऱ्यांनी शासन निर्णयाची होळी करत आंदोलन केले.

भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात शेकडो शेतकरी सहभागी झाले होते. यावेळी सरकारविरोधात घोषणाबाजी करत कर्जमाफीतील अटींविरोधात निषेध व्यक्त करण्यात आला.



यावेळी बोलताना संतोष वाडेकर यांनी सांगितले की, सध्याची कर्जमाफी योजना आजपर्यंतच्या कर्जमाफी योजनांमधील सर्वाधिक कठोर अटी असलेली असून त्याचा लाभ अत्यंत कमी शेतकऱ्यांना मिळणार आहे. त्यामुळे सरकारने कोणत्याही अटींशिवाय सरसकट कर्जमाफी जाहीर करावी.

शेतकऱ्यांच्या या कथित फसवणुकीविरोधात राज्यभर तीव्र नाराजी असून विविध ठिकाणी आंदोलनांच्या माध्यमातून हा संताप व्यक्त होत असल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे आगामी काळात शेतकरी संघटना सरकारविरोधात अधिक आक्रमक भूमिका घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

कर्जमाफी संदर्भातील शासन निर्णयावर टीका करताना वाडेकर म्हणाले की, २०१९ मध्ये कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या आणि सध्या थकीत असलेल्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच कर्जमाफी देण्याची तरतूद करण्यात आली आहे. नियमित कर्जदार शेतकऱ्यांनाही ५० हजार रुपयांचीच मर्यादा घालण्यात आली असून त्यासाठी किमान दोन वर्षे नियमित कर्जफेड केलेली असणे ही अट घालण्यात आली आहे. तसेच सहकार क्षेत्रातील अल्प वेतनधारक कर्मचाऱ्यांनाही कर्जमाफीच्या लाभातून वगळण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र आता दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीची घोषणा करून प्रत्यक्षात बहुसंख्य शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांचा लाभ देण्याचा प्रयत्न होत असल्याने ही शेतकऱ्यांची फसवणूक असल्याची टीका त्यांनी केली.

आंदोलनादरम्यान सर्व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, कर्जमाफीवरील सर्व अटी रद्द कराव्यात, नियमित कर्जदार शेतकरी, शेडनेट व पॉलीहाऊसधारक शेतकरी, कुक्कुटपालन व्यावसायिक तसेच पीककर्ज व शेती सुधारणा कर्जधारकांना कर्जमाफीच्या कक्षेत समाविष्ट करावे, अशा विविध मागण्या करण्यात आल्या.

या आंदोलनात भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर, सरपंच पोपट दरेकर, चेअरमन संतोष टेकुडे, विशाल वाडेकर, ठमाजी भोर, रावसाहेब फटांगरे, काशिनाथ गोळे, मंजाबापू वाडेकर, पंडित गागरे, साहेबराव भोर, शंकर भोर, अजित वाडेकर, राहुल पारधी, देविदास टेकुडे, किरण फटांगरे, तेजस फटांगरे, हर्षद वाडेकर, गणेश फटांगरे, बाळासाहेब वाडेकर, पप्पू वाडेकर, भाऊसाहेब दरेकर, एकनाथ फटांगरे, नवनाथ जाधव, सुरेश दरेकर, सचिन खाडे, साहेबराव वाडेकर, उपसरपंच सचिन भोर, शांताराम भोर, बाबासाहेब वाडेकर, पोपट फटांगरे, शंकर टेकुडे, दत्ता फटांगरे, बबन भोर, सचिन घेमूड यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## पारनेरमध्ये केमिकलयुक्त आंबे आणि भेसळयुक्त फळांचा बाजार तेजीत

**● पारनेर । वीरभूमी–**

उन्हाळ्याचा हंगाम सुरू होताच बाजारात रसाळ आंब्यांसह विविध फळांची आवक मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. मात्र, पारनेर शहर आणि तालुक्यातील प्रमुख बाजारपेठांमध्ये सध्या रंगाने पिवळेधमक दिसणारे आंबे आणि फळे ग्राहकांचे लक्ष वेधून घेत असली, तरी यामागील 'केमिकल'चा काळा खेळ चिंताजनक बनला आहे. अवघ्या काही तासांत आंबे पिकवण्यासाठी धोकादायक 'कॅल्शियम कार्बाइड' आणि इतर रसायनांचा सर्रास वापर केला जात असल्याने, पारनेरमधील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न आता पार ऐरणीवर आला आहे.


पारनेर, सुपे, टाकळी ढोकेश्वर, निघोज, अळकुटी यांसारख्या प्रमुख बाजारपेठांमध्ये दररोज टनांनी आंब्याची आवक होत आहे. नैसर्गिकरीत्या आंबे पिकण्यासाठी लागणारा वेळ वाचवून जास्तीत जास्त नफा कमावण्याच्या हव्यासापोटी काही व्यापारी फळे कृत्रिमरीत्या पिकवत आहेत. बंदी असलेल्या कॅल्शियम कार्बाइडच्या पुड्या आंब्याच्या पेट्यांमध्ये ठेवल्या जात आहेत, तर काही ठिकाणी रसायनांची फवारणी केली जात आहे. बाहेरून अतिशय आकर्षक आणि पिवळीधमक दिसणारी ही फळे आतून मात्र कच्ची आणि चवहीन असतात. या रासायनिक फळांच्या सेवनामुळे पारनेर तालुक्यातील नागरिकांमध्ये विशेषतः लहान मुले आणि वृद्धांमध्ये उलट्या, जुलाब, पोटदुखी आणि घशाचे विकार वाढले आहेत. खाजगी व शासकीय रुग्णालयांमध्ये पोटाच्या विकारांचे रुग्ण वाढल्याचे वैद्यकीय सूत्रांचे म्हणणे आहे. दीर्घकाळ अशा केमिकलयुक्त फळांचे सेवन केल्यास कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो. केमिकलयुक्त आंबे ओळखणे गरजेचे आहे. जे आंबे बाहेरून पूर्ण पिवळे पण देठाजवळ हिरवे असतात किंवा पाण्यात टाकल्यावर तरंगतात, ते रासायनिक पद्धतीने पिकवलेले असण्याची शक्यता जास्त असते. नागरिकांनी फळे खाण्यापूर्वी ती स्वच्छ धुवून घ्यावीत, असे वैद्यकीय तज्ज्ञांचे मत आहे.

## बनावट आरसी बुकच्या आधारे डंपर सोडविण्याचा प्रयत्न उधळला

### बेकायदेशीर वाळू वाहतुकीतील वाहनासाठी खोटे कागदपत्र सादर । पाथर्डी पोलिसांची कारवाई

**● पाथर्डी । वीरभूमी –**

बेकायदेशीर वाळू वाहतूक करताना जप्त करण्यात आलेली डंपर गाडी कोर्टातून सोडवून घेण्यासाठी बनावट आरसी बुक आणि खोटी कागदपत्रे तयार करून महसूल प्रशासन, पोलीस आणि न्यायालयाची फसवणूक करण्याचा धक्कादायक प्रकार पाथर्डी येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी एका आरोपीविरुद्ध फसवणूक व बनावट कागदपत्रे तयार केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पाथर्डी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अवैध वाळू वाहतुकीच्या गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांनी आरोपी कुंडलीक विष्णू काकडे (वय २८, रा. तोंडोळी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) याच्या ताब्यातील टाटा डंपर जप्त करून तो पोलीस ठाण्याच्या आवारात उभा केला होता. या गुन्ह्याचा तपास हेडकॉन्स्टेबल सुहास बाबासाहेब बटुळे यांच्याकडे सोपविण्यात आला होता.

तपासादरम्यान आरोपीने जप्त डंपर सोडवून घेण्यासाठी पोलिसांसमोर एक आरसी बुक सादर केले. त्यामध्ये डंपरचा क्रमांक एमएच-३२-क्यू-४७४४ असून मालक म्हणून स्वतः चे नाव नमूद करण्यात आले होते. पोलिसांनी या आरसी बुकची प्रत आरोपीच्या स्वाक्षरीसह ताब्यात घेतली. मात्र कागदपत्रांबाबत संशय आल्याने तपास अधिकारी सुहास बटुळे यांनी डंपरच्या मूळ चेसीस क्रमांक M-T373122F1B04220 आणि इंजिन क्रमांक 697TC69BUY102268 यांच्या आधारे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) अधिकृत माहिती मागविली.

आरटीओच्या अहवालात जप्त डंपरचा खरा क्रमांक एमएच-३२-क्यू-४९४४ असल्याचे स्पष्ट झाले. तसेच या वाहनाचे मूळ मालक राजेश खवाशी (रा. पालोरा, ता. कारंजा, जि. वर्धा) असल्याचे समोर आले.

यापेक्षाही धक्कादायक बाब म्हणजे आरोपीने पोलिसांना दाखविलेला एमएच-३२-क्यू-४७४४ हा क्रमांक डंपरचा नसून नागपूर येथील योगेश खोब्रागडे यांच्या मालकीच्या ऑटो रिक्षाचा असल्याचे ई-चलन पवरील पडताळणीत निष्पन्न झाले.

चौकशीत आरोपीने डंपरचा मूळ क्रमांक, मालकाचे नाव आणि पत्ता बदलून हुबेहूब बनावट आरसी बुक तयार केल्याचे उघड झाले. हे बनावट कागदपत्र पोलिसांना सादर करून न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.

हा प्रकार उघडकीस आल्यानंतर हेडकॉन्स्टेबल सुहास बाबासाहेब बटुळे यांच्या फिर्यादीवरून आरोपी कुंडलीक विष्णू काकडे याच्याविरुद्ध सरकारी कागदपत्रांचा गैरवापर, बनावट कागदपत्र तयार करणे आणि फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

आरोपीने सादर केलेले आरसी बुक प्रथमदर्शनी अस्सल वाटत असतानाही, केवळ कागदपत्रांवर विसंबून न राहता हेडकॉन्स्टेबल सुहास बटुळे यांनी पोलिस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली सखोल आणि तांत्रिक तपास केला. डंपरच्या चेसीस आणि इंजिन क्रमांकांची थेट आरटीओ नोंदींशी पडताळणी करून, डंपरच्या क्रमांकाआड लपलेली ऑटो रिक्षाची माहिती शोधून काढण्यात पोलिसांना यश आले.

# देवठाण आश्रमशाळेची शालांत परीक्षेत दैदिप्यमान कामगिरी

### पूजा खोकले व रुद्राक्ष भोईर यांना आदिवासी विकास विभागाकडून प्रत्येकी ३५ हजारांचे रोख पारितोषिक जाहीर

**● अकोले । वीरभूमी–**

शालांत व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत विशेष गुणवत्तेसह प्राविण्य प्राप्त अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक स्तरावर जाहीर करण्यात आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीत आदिवासी उन्नती सेवा मंडळ, राजूर संचलित अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, देवठाण (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) यांनी उल्लेखनीय यश संपादन करून आपला शैक्षणिक दर्जा पुन्हा एकदा सिद्ध केला आहे.

विद्यालयातील विद्यार्थिनी कु. पूजा चंद्रकांत खोकले (रा. पाचपट्टा) हिने शालांत परीक्षेत ८९.६० टक्के गुण प्राप्त करून मुलींच्या गटात प्रथम क्रमांक मिळविला आहे. तसेच विद्यालयाचा विद्यार्थी चि. रुद्राक्ष शांताराम भोईर (रा. टाकळी) याने ८६ टक्के गुण मिळवत मुलांच्या गटात प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

या उल्लेखनीय यशाची दखल घेत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक कार्यालयामार्फत दोन्ही गुणवंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी ३५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,





राजूर यांच्याकडूनही विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर आर्थिक बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव अधिक वाढला असून इतर विद्यार्थ्यांनाही उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीसाठी प्रेरणा मिळणार आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, अभ्यासातील जिद्द, चिकाटी आणि शिस्तबद्ध तयारी याबरोबरच शिक्षकांचे मार्गदर्शन व परिश्रम महत्त्वाचे ठरले आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी नियमित अध्यापन, अतिरिक्त सराव वर्ग, वैयक्तिक मार्गदर्शन, विविध अभ्यास चाचण्या तसेच सतत मूल्यमापनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सक्षम बनविले.

विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी शैक्षणिक नियोजन, गुणवत्तापूर्ण अध्यापन, पालकांशी सातत्यपूर्ण समन्वय, विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे आणि शिक्षकांना आवश्यक मार्गदर्शन करणे या माध्यमातून उत्कृष्ट नेतृत्व प्रदान केले. त्यांच्या कुशल नियोजनामुळे आणि शिक्षकांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हे यश संपादन करणे शक्य झाले आहे.

आदिवासी उन्नती सेवा मंडळ, राजूर ही अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात कार्यरत असलेली एक अग्रगण्य सामाजिक व शैक्षणिक संस्था आहे. दुर्गम व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सर्वांगीण विकासासाठी संस्था विविध आश्रमशाळा व वसतिगृहे यशस्वीपणे चालवत आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, निवासी सुविधा, शैक्षणिक साहित्य, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन तसेच प्रगत शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यात संस्थेचा मोलाचा वाटा आहे.

# फुल दिले की फुलच मिळते, दगड दिले की दगडच मिळते : जॅकी श्रॉफ

### ट्री आर्मीच्या वृक्षलागवड मोहिमेचा शुभारंभ । आमदार सुहास बाबर यांच्या पर्यावरण चळवळीचे कौतुक

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

फुल दिले की फुलच मिळते, दगड दिले की दगडच मिळते. त्यामुळे कुणी टीका केली तर शांत राहायचं. कुणाचे पाय कापून आपण उंच होऊ शकत नाही, असा सकारात्मक संदेश ज्येष्ठ अभिनेते गरलज्ञळश डह्रीषष यांनी दिला.

गार्डी-घानवडच्या माळावर ट्री आर्मी आणि जेके फाउंडेशनच्या वतीने आयोजित वृक्षलागवड मोहिमेच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. या उपक्रमांतर्गत साडेचार हजार वृक्षांची लागवड करण्यात आली. जॅकी श्रॉफ यांच्या हस्ते या लोकचळवळीचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला.

यावेळी बोलताना जॅकी श्रॉफ यांनी खानापूर-आटपाडीचे आमदार डींहरी इरलरी यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. आमदार सुहास बाबर म्हणजे पिंपळाच्या झाडासारखा सळसळता उत्साह आहे. त्याला वाढविण्याची, जपण्याची आणि पाणी घालण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे, असे ते म्हणाले.

फक्त बोलणारे आणि प्रत्यक्ष काम करणारे यांच्यात मोठा फरक असतो. सुहास बाबर हे बोलण्याइतकेच कृतीतही प्रामाणिक आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी त्यांनी उभारलेली ही चळवळ समाजाला दिशा देणारी आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. पृथ्वी ही आपली आई असून तिचे संवर्धन करण्यासाठी प्रत्येकाने झाडे लावली पाहिजेत, असे आवाहनही त्यांनी केले.

आमदार सुहास बाबर यांनी ट्री आर्मी ही कोणत्याही राजकीय पक्षाची नव्हे, तर समाजाची चळवळ असल्याचे स्पष्ट केले. विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या मताधिक्याइतकी झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला असून पुढील दोन वर्षांत ७८ हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

जॅकी श्रॉफ यांच्या सहभागामुळे या मोहिमेला राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळेल. विट्यातून सुरू झालेली ट्री आर्मी आता देशभर आणि जगभर पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला मुंबईहून जॅकी श्रॉफ यांचे मित्र तसेच ड्रीम वर्थ सोल्युशन कंपनीचे संचालक उपस्थित होते. यावेळी खानापूर पंचायत समितीच्या सभापती सुवर्णा भोसले, नगराध्यक्षा काजल म्हेत्रे, उपनगराध्यक्ष अमोल बाबर, प्रांताधिकारी डॉ. विक्रम बांदल, तहसीलदार योगेश्वर टोम्पे, उपविभागीय पोलिस अधिकारी विपुल पाटील, गटविकास अधिकारी डॉ. संताजी पाटील, पोलिस निरीक्षक धनंजय फडतरे, उपसभापती सुहास शिंदे, माजी नगरसेवक अमर शितोळे, रणजित पाटील, हेमंत बाबर, प्रकाश बागल, रामचंद्र भिंगारदेवे, भालचंद्र कांबळे, रोहित पाटील,



ॲड. रोहित पवार, श्रीधर जाधव, संग्राम नलवडे, सौरभ रोकडे, विशाल पाटील, दिलीप किर्दत, सुजय गोसावी यांच्यासह ट्री आर्मीचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक फिरोज शेख यांनी केले. सूत्रसंचालन धीरज भिंगारदेवे यांनी तर आभार राहुल साळुंखे यांनी मानले.

यावेळी आमदार सुहास बाबर म्हणाले,



मी स्वतःला खूप जमिनीवर राहून काम करणारा माणूस समजत होतो. मात्र जॅकी दादांकडे पाहिल्यानंतर माझा हा समज बदलला. इतका मोठा सेलिब्रिटी असूनही ते अत्यंत साधे, विनम्र आणि माणुसकी जपणारे आहेत.

आमदारांच्या पत्नी सोनिया बाबर यांनी जॅकी श्रॉफ यांचे औक्षण करून पुष्पवृष्टीत स्वागत केले. त्यानंतर त्यांनी बाजरीची भाकरी, तूप, गूळ आणि मीठ असा साधा नाश्ता स्वीकारला. इतका साधा माणूस मी माझ्या आयुष्यात पाहिला नाही, असे गौरवोद्गार आमदार बाबर यांनी यावेळी काढले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com


वीरभूमी
वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा!
कुकडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्यासाठी इतिहासाच्या
40 वर्षात पहिल्यांदाच मिळाला 449 कोटी
रुपयांचा उच्चांकी निधी...!
जुन्नर (पुणे), पारनेर-श्रीगोंदा-कर्जत (अहिल्यानगर) व करमाळा (सोलापूर) या भागातील शेतकऱ्यांना आता पूर्ण दाबाने मिळणार पाणी
पाण्याची होणार मोठी बचत
पिकांच्या उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांचे वाढणार उत्पन्न
हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार
जिल्ह्याचे पालकमंत्री तथा
जलसंपदा मंत्री आदरणीय
नामदार श्री. राधाकृष्ण विखे पाटील साहेब
तसेच माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील
यांचे मन:पूर्वक
जाहीर आभार!
शुभेच्छूक- समस्त लाभधारक शेतकरी